# महाविद्यालय दिवस समारोह

## अहवाल

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कला-गुणांना वृद्धीगंत करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात दिनांक १५ व १६ जानेवारी २०१६ रोजी महाविद्यालय दिवस समारोह 'प्रयास २०१६' चे आयोजन करण्यात आले होते. 'प्रयास २०१६' चे उद्‌घाटन महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. आर.आर. धोटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालय दिवस समारोहाचे प्रभारी प्राध्यापक डॉ. पुनित राऊत मंचावर उपस्थित होते.

'प्रयास २०१६' अंतर्गत नृत्य स्पर्धा (एकल व समुह), गीत गायन, कवि संमेलन, फॅशन शो, अंताक्षरी या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या.

सदर स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण १५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक स्पर्धेत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातून प्रथम व द्वितीय विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

दिनांक १६ जानेवारी २०१६ रोजी झालेल्या बक्षिस वितरण समारोहाला अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्मानीय सदस्य श्री प्रकाशजी चांडक तसेच शि.प्र.मं. सन्माननीय सदस्य ॲड. दिपकजी केने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. आर.आर. धोटे यांनी केले व कार्यक्रमाचे संचालन डॉ. टि.एल. जगदळे यांनी केले.

**प्रा. डॉ. पुनित एन. राऊत**
प्रभारी प्राध्यापक

**प्रा. मुकेश जाधव**
समीती सदस्य

# महाविद्यालय दिवस समारोहातील क्षणचित्रे
























# अहवाल

# २०१५–१६

नबीरा महाविद्यालय, काटोल येथे वरिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक मंडळाच्या वतीने तीन दिवसीय 'अभिनय संस्कार कार्यशाळा' दिनांक १४, १५ व १६ सप्टेंबर २०१५ ला मुंबई येथील नाट्यकर्मी श्री नितीन भजन व सौ. वैखरी पाठक (भजन) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत वरिष्ठ महाविद्यालयातील एकुण ४६ विद्यार्थी सहभागी होते. कार्यशाळेच्या प्रथम दिवशी सहभागी विद्यार्थ्यांचे पाच गटात विभाजन करण्यात आले आणि प्रत्येक गटाला समाजातील वेगवेगळे विषय नाटकांसाठी सुचविण्यात आले त्यापैकी सहभागी गटांनी आध्यात्मिक गुरू राधे माँ, सरकारी रूग्णालय, रेल्वे स्टेशन, मैत्रीत धोका आणि फ्लासमेंट या प्रसंगानुरूप नाटकाच्या माध्यमाने विषय हाताळण्याचा प्रयत्न केला तसेच या माध्यमाने सामाजिक संदेश देण्याचा पुरेपुर प्रयत्न केला गेला.

कार्यशाळे अंतर्गत मार्गदर्शकांनी आवाजातील चढउतार, सादरीकरणातील संवाद, आपआपसातील समन्यय व इतर सुक्ष्म बाबी यावर सखोल सअभिनय मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या अंतिम दिवशी सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या नाटिका समारोपिय कार्यक्रमाअंतर्गत सादर केल्या. समारोपिय कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पाटील, प्रमुख उपस्थिती प्रा. विजय कडू (पत्रकार), नाटयशाळेचे मार्गदर्शक श्री नितीन भजन, सौ. वैखरी भजन, महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. प्रस्तुत कार्यशाळेचे प्रास्ताविक सांस्कृतिक मंडळाच्या प्रमुख प्रा. डॉ. कु. वैशाली रूईकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन बि. कॉम II मधील विद्यार्थीनी कु. कल्याणी हिवसे हिने केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. जयश्री पाटील, प्रा. मुकेश जाधव, प्रा. आदिल जीवाणी यांनी सहकार्य केले.

बुधवार दिनांक २३ सप्टेंबर २०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता महाराष्ट्रातील प्रसिध्द हास्य कवी डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा (Z' T.V. फेम) 'मिर्झा एक्सप्रेस' या हास्य कवितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रस्तुत कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वरूप प्रास्ताविकाव्दारे विद्यार्थ्यासमोर मांडले प्रमुख अतिथींची ओळख प्रा. विजय कडू यांनी करून दिली.

कार्यक्रमाअंतर्गत डॉ. मिर्झा रफी अहमद बेग तसेच त्यांच्या सहकारी कवियत्री कांचन वीर यांनी समाजातील विविध विषयांवर हास्य कवितांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांचे उद्बोधन व मनोरंजन केले. या कार्यक्रमाचा आस्वाद महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. वैशाली रूईकर यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप आभारप्रदर्शनाव्दारे महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. राजू धोटे यांनी केला. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक मंडाच्या समन्वयक प्रा. डॉ. व्ही. आर. रूईकर, मंडहाचे सदस्य प्रा. मुकेश जाधव, प्रा. डॉ. पुनित राऊत यांनी प्रयत्न केले.

२ ऑक्टोबर २०१५, रोजी गांधी जयंती व लालबहद्दूर शास्त्री जयंती निमित्त महाविद्यालयात 'स्वच्छ भारत अभियान' कार्यक्रम सकाळी ९.०० वाजता आयोजित करण्यात आला. या अंतर्गत सर्वप्रथम महात्मा गांधी आणि लालबहाद्दूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी श्री वाळके आणि विद्यार्थी प्रतिनिधी सचिन पुरी, कु. प्रियंका सावरकर आणि कु. विद्या सावरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी खरा तो एकची धर्म या प्रार्थनेव्दारे आदरांजली वाहिली. तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कोराडी यांच्यातर्फे आयोजित निबंध स्पर्धेत महाविद्यालयीन गटात कु. दिव्या सावरकर (B. Comm. II) हिला व्दितीय पारितोषिक सन्मनचिन्ह प्रमाणपत्र व रोख रूपये ७००/– प्राप्त झाले. तिचे या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्यातर्फे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विक्की गजभिये, संदिप जुकसेनिया, कु. अपर्णा गवईकर आणि विद्या सावरकर यांनी महात्मा गांधी बद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

स्वच्छता अभियानासंदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पाटील यांनी सर्व सहभागी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना पुढील दिशनिर्देश दिले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. वैशाली रूईकर यांनी केले. प्राचार्यांच्या दिशानिर्देशानुसार सहभागी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, लोकसंख्या शिक्षण मंडळ च्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता करून स्वच्छ भारत अभियानामध्ये यशस्वीरित्या सहभाग नोंदविला.

सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी ''रांगोळी आणि मेहंदी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेत १९ आणि मेहंदी स्पर्धेत ३८ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेच्या परिक्षणाचे कार्य सौ मधु ठोमा आणि डॉ. किरण राठी यांनी पार पाडले.

स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांची नावे :—

रांगोळी स्पर्धा

१. कु. कल्याणी पर्वत B. Com.- II (संस्कार भारती)

२. कु. पुजा झुरय B. Com.- III (फ्री हॅन्ड)

३. कु. शीतल चोपडे B. B. A. – III (फ्री हॅन्ड)

मेहंदी स्पर्धा

१. कु. प्रांजळी टेकाडे B. Com.- II प्रथम क्रमांक

२. कु. कल्याणी पर्वत B. Com.- II व्दितीय क्रमांक

३. कु. मनीषा गायकवाड B. A. I तृतीय क्रमांक

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी कु. पल्लवी भुरे, कु. जयश्री राऊत आणि प्रा. कोमल ठवीरा आणि प्रा. एस. डी. डाखर यांनी सहकार्य केले.

परिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा आंतर महाविद्यालयीन स्पर्धा सहभाग

१. निबंध स्पर्धा —

महाविद्यालय — शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कोराडी

विषय :— "मेजर ध्यानचंद यांना भारत रत्न देवून गौरविण्यात यावे."

सहभागी स्पर्धक :—

१. कु. विद्या रामदास सावरकर B. Com.- II (Eng)

२. कु. शितल पांडुरंगजी कुबडे B. Com.- II

३. कु. कल्याणी किशोर हिवसे B. Com.- II

कु. विद्या सावरकर हीला महाविद्यालय गट, व्दितीय क्रमांक रोख ७०१ :—रु., सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

२. वादविवाद स्पर्धा —

महाविद्यालय — अरविंद बाबु देशमुख महाविद्यालय, भारसींगी

स्पर्धेचा विषय :— "निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे."

सहभागी स्पर्धक :—

१. विक्की साहेबराव गजभिये B. A.- II

२. शुभम लालसिंग मोहरिया B. A.– III

परिसंवाद — महाविद्यालय अरविंद बाबु देशमुख महाविद्यालय, भारसींगी

स्पर्धेचा वि  ाय :— "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व राजकीय विचार."

सहभागी स्पर्धक :— १. विक्की साहेबराव गजभिये B. A. – II यांना तृतीय क्रमांकाचे रोख ५०१रु. सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्राप्त झाले.

३. गीत गायन स्पर्धा —

महाविद्यालय — तायवाडे महाविद्यालय, कोराडी

सहभागी स्पर्धक :—

१. कु. कल्याणी हिवसे. B. Com. - II

२. कु. योगीनी चाफले B. Sc. - I

कु. कल्याणी हिवसे यांना व्दितीय क्रमांक ५०१रू. रोख आणि प्रमाणपत्र प्राप्त झाले.

राज्य स्तरीय आंतरविद्यापीठ 'इंद्रधनुष्य' व मध्य विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यापीठ संघ २०१५ साठी निवड चाचणीसाठी वरि  ष्ठ महाविद्यालयाच्या वतीने संगीताच्या विविध चाचण्यांसाठी खालील विद्यार्थी सहभागी झाले होते.

१. कु. कल्याणी हिवसे. B. Com. – II

(Classical, Vocal Solo, Light Vocal, Western Solo)

१. श्री तीर्थानंद राऊत M. Com.

(Light Vocal Music)

डॉ. वैशाली रूईकर

समन्वयक

सांस्कृतिक मंडळ

# नबीरा महाविद्यालय काटोल

## सांस्कृतिक मंडळ

## सभा सूचना

दिनांक: 10/09/2015

सांस्कृतिक मंडळ, नबीरा महाविद्यालय काटोल, द्वारे दिनांक 12/09/2015 रोजी सकाळी 11.00 वाजता सांस्कृतिक मंडळ समितीची सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेची विषय सूची खालीलप्रमाणे आहे.

विषय सूची :-

1. सत्र 2015-16 साठी सांस्कृतिक मंडळाची स्थापणा करणे.
2. चालू सत्राकरिता महाविद्यालय स्तरावर विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजना संबधी विचार विनिमय करणे.
3. चालू सत्राकरिता विविध आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी चर्चा करणे.
4. विद्यापीठ स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धामध्ये विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी योग्यती कार्यवाहीसाठी विचार विनिमय करणे.
5. अभिनय संस्कार कार्यशाळा आयोजित करण्याबाबत चर्चा करणे.
6. सत्र 2015-16 साठी सांस्कृतिक मंडळाच्या कार्यविभागणी विषयी चर्चा करणे.

समन्वयक सांस्कृतिक मंडळ
डॉ. व्ही. आर. रुईकर

1. डॉ. व्ही. आर. रुईकर
2. डॉ. पी. व्ही. सलामे
3. प्रा. एम. एस. जाधव

# नबीरा महाविद्यालय काटोल

## सांस्कृतिक मंडळ

## कार्यवृत्त

दिनांक: 13/09/20/15

सांस्कृतिक मंडळ, नबीरा महाविद्यालय काटोल, द्वारे दिनांक 12/09/2015 रोजी सकाळी 11.00 वाजता सांस्कृतिक मंडळ समितीची सभा आयोजित करण्यात आली, सभेसाठी खालील समिती सभासद उपस्थित होते.

1. डॉ. व्ही. आर. रुईकर
2. डॉ. पी. व्ही. सलामे
3. प्रा. एम. एस. जाधव

सभेतील विषयावर चर्चा करुन ठराव घेण्यात आले.

विषय क्र. 1सत्र 2015-16 साठी सांस्कृतिक मंडळाची स्थापणा करणे.

ठराव क्र. 1 सत्र 2015-16 साठी सांस्कृतिक स्पर्धांच्या आयोजनासाठी मंडळाची स्थापणाकरण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

विषय क्र. 2 चालू सत्राकरिता महाविद्यालय स्तरावर विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजना संबधी विचार विनिमय करणे.

ठराव क्र. 2 सत्र 2015-16 मध्ये महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, मेहंदी स्पर्धा व रांगोळी स्पर्धा अयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 3 चालू सत्राकरिता विविध आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी चर्चा करणे.

ठराव क्र. 3 चालू सत्रात महाविद्यालयातील विध्यार्थ्याचा विविध महाविद्यालयातील सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 4 विद्यापीठ स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धामध्ये विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी योग्यती कार्यवाहीसाठी विचार विनिमय करणे.

ठराव क्र. 4 चालू सत्रात विद्यापीठ स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धामध्ये विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी वेळो वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाईल असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 5 अभिनय संस्कार कार्यशाळा आयोजित करण्याबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. 5 "अभिनय संस्कार" या तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन 14 ते 16 सप्टेंबर 2015 ला मुबई येथील नाट्यकर्मी श्री नितीन भजन आणि सो. वेखरी पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती कार्यशाळेत एकूण 46 विद्यार्थी सहभागी झाले याची नोंद घेण्यात आली.

(डॉ. व्ही. आर. रुईकर)
समन्वयक सांस्कृतिक मंडळ

विषय क्र. 6 सत्र 2015-16 साठी सांस्कृतिक मंडळाच्या कार्यविभागणी विषयी चर्चा करणे.

ठराव क्र. 6. सत्र 2015-16 साठी विविध सांस्कृतिक मंडळाच्या जबाबदारीचे विभाजन खालील प्रमाणे करण्याचे सर्वानुमते निश्चित झाले.

1. डॉ. पी. के. सलामे - गीतगायन मार्गदर्शन
2. प्रा. एम. एस. जाधव - वादविवाद आणि वक्तृ स्पर्धा आयोजन
3. डॉ. व्ही. आर. रुईकर - स्पर्धांच्या आयोजनाबाबत विद्यार्थ्यांना माहिती देणे व त्यांच्या सहभागासाठी पुर्ण प्रक्रिया करणे.
4. डॉ. व्ही. आर. रुईकर - मेहंदी आणि रांगोळी स्पर्धा आयोजन.
5. प्रा. एम. एस. जाधव - नृत्य आणि एकांकिका स्पर्धा आयोजन.

समन्वयक सांस्कृतिक मंडळ
डॉ. व्ही. आर. रुईकर

# नबीरा महाविद्यालय काटोल

## सांस्कृतिक मंडळ

## सभा सूचना

दिनांक: 06/03/2016

सांस्कृतिक मंडळ, नबीरा महाविद्यालय काटोल, द्वारे दिनांक 07/03/2016 रोजी सकाळी 11.00 वाजता सांस्कृतिक मंडळ समितीची सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेची विषय सूची खालीलप्रमाणे आहे.

विषय सूची :-

1. महाविद्यालय स्तरावर आयोजित स्पर्धेबाबत नोंद घेणे.
2. आंतरमहाविद्यालय स्पर्धेतील सहभागाबाबतनोंद घेणे.
3. विद्यापीठ स्तरीय स्पर्धेतील सहभागाबाबतनोंद घेणे.
4. वार्षिक अहवाल तयार करण्याबाबत चर्चा करणे.
5. सत्र 2015-16 मध्ये आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचा आढावा घेणे.

समन्वयक सांस्कृतिक मंडळ
डॉ. व्ही. आर. रुईकर

1. डॉ. व्ही. आर. रुईकर
2. डॉ. पी. व्ही. सलामे
3. प्रा. एम. एस. जाधव

# नबीरा महाविद्यालय काटोल

## सांस्कृतिक मंडळ

### कार्यवृत्त

दिनांक: 08/03/2016

सांस्कृतिक मंडळ, नबीरा महाविद्यालय काटोल, द्वारे दिनांक 07/03/2016 रोजी सकाळी 11.00 वाजता सांस्कृतिक मंडळ समितीची सभा आयोजित करण्यात आली, सभेसाठी खालील समिती सभासद उपस्थित होते.

1. डॉ. व्ही. आर. रुईकर
2. डॉ. पी. व्ही. सतामे
3. प्रा. एम. एस. जाधव

सभेतील विषयावर चर्चा करून ठराव घेण्यात आले.

विषय क्र. 1 महाविद्यालय स्तरावर आयोजित स्पर्धेबाबत नोंद घेणे.

ठराव क्र. 1 महाविद्यालय स्तरावर सत्र 2015-16 मध्ये रांगोळी स्पर्धा आणि मेहंदी स्पर्धा सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत आयोजित करण्यात आल्या यात वरिष्ठ महाविद्यालयातील 38 विद्यार्थांनी सहभाग घेतल्याची नोंद घेण्यात आली.

विषय क्र. 2 आंतरमहाविद्यालय स्पर्धेतील सहभागाबाबत नोंद घेणे.

ठराव क्र. 2 आंतरमहाविद्यालय स्तरावर निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, गीतगायन स्पर्धा यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याची नोंद घेण्यात आली.

विषय क्र. 3 विद्यापीठ स्तरीय स्पर्धेतील सहभागाबाबत नोंद घेणे.

ठराव क्र. 3 रा. तु. म. नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित 'इंद्रधनुष्य' व युवा महोत्सव स्पर्धेसाठी विद्यापीठ संघ निवड चाचणी साठी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याची नोंद घेण्यात आली.

विषय क्र. 4 वार्षिक अहवाल तयार करण्याबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. 4 सत्र 2015-16 सांस्कृतिक मंडळ द्वारे आयोजित कार्यक्रमांचा आढावा घेऊन वार्षिक अहवाल तयार करून त्यास मंजुरी देण्यात आली.

विषय क्र. 5 सत्र 2015-16 मध्ये आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचा आढावा घेणे.

ठराव क्र. 5 सत्र 2015-16 मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत दिनांक 14 ते 16 सप्टेंबर 2015 तीन दिवसीय अभिनय संस्कार कार्यशाळा, 'Z' T. V. फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा 'मिर्झा एक्स्प्रेस' हा हास्य कवितांचा कार्यक्रम, बुधवार दिनांक 23 सप्टेंबर, 2015 रोजी, आणि २ ऑक्टोबर, 2015 रोजी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमीत्त 'स्वच भारत अभियान' राबविण्यात आल्याची नोंद घेण्यात आली.

समन्वयक सांस्कृतिक मंडळ

डॉ. व्ही. आर. रुईकर